# तुकाराम मुंढेंचा ॲमेझॉन इंडियाला दणका !

प्रतिनिधी २७ जून

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या राज्यात बेकायदेशीर आणि मानवी आरोग्याशी खेळणाऱ्या घटकांविरोधात कारवायांचा धडका सुरू आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून भिवंडी तालुक्यातील सरवली येथील अ?मेझॉन रिटेल इंडिया' या नामांकित कंपनीच्या गोदामावर अन्न सुरक्षा पथकाने मोठी कारवाई केली आहे. मुदतबाह्य झालेले आणि मानवी आरोग्यास घातक ठरणारे अन्नपदार्थ नष्ट न करता, नागरिकांची दिशाभूल करून ते पुन्हा विक्रीसाठी अन्नसाखळीत वळवल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अ?मेझॉन रिटेलच्या फॅसिलिटी मॅनेजरसह दोघांविरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सरवली येथील ॲमेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि. आणि आर. के. ट्रेडर्स यांच्या संगनमताने मुदतबाह्य झालेले अन्नपदार्थ नष्ट न करता ते पुन्हा बाजारात विक्रीसाठी पाठवले जात असल्याची खात्रीशीर माहिती अन्न सुरक्षा पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे बुधवारी

## ◆ मुदतबाह्य अन्नपदार्थ विकणाऱ्या गोदामाचा थेट परवाना रद्द



मध्यरात्री पथकाने या गोदामावर अचानक धाड टाकली. या कारवाईदरम्यान धक्कादायक वास्तव समोर आले. 'मे. आर. के. ट्रेडर्स'चे मालक रहमान के. यांनी कराराचे पालन न करता, हे मुदतबाह्य अन्नपदार्थ नष्ट केल्याचे खोटे विल्हेवाट प्रमाणपत्र सादर केले होते. प्रत्यक्षात मात्र, हे मानवी आरोग्यास घातक ठरू शकणारे अन्नपदार्थ बाजारात पुन्हा विक्रीसाठी पाठवले जात होते. या संपूर्ण काळ्या बाजारात अ?मेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि. चे कालबाह्य व खराब अन्नपदार्थ विल्हेवाट हाताळणारे संबंधित कर्मचारी आणि पश्चिम क्षेत्राचे फॅसिलिटी मॅनेजर सोमशेखर बसवराज कोन्नूर हे थेट सामील असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी अरविंद वसंत कांडेलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोनगाव पोलीस ठाण्यात मे. आर. के. ट्रेडर्सचे मालक रहमान के. आणि अ?मेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि.चे फॅसिलिटी मॅनेजर सोमशेखर बसवराज कोन्नूर या दोघांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळून त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसांत भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), २७४, ३(५) सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम २६(१), २६(२)(आय), २७(१), २७(३)(ई) आणि ३१(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या या धडक कारवाईमुळे अन्नपदार्थांचा काळा बाजार करणाऱ्या माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

### गोदामाचा परवाना रद्द

दरम्यान, सरवली (भिवंडी) येथील ज्या अमेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि.च्या गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली, त्या विशिष्ट आस्थापनेचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे. मुदतबाह्य व खराब अन्नपदार्थांची विल्हेवाट लावण्याऐवजी ते पुन्हा विक्रीसाठी वळवल्याचा आरोप सिद्ध झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली असून, हा निर्णय केवळ संबंधित गोदामाच्या परवान्यापुरताच लागू आहे.

# मुंबई विमानतळावर सोन्याच्या आंतरराष्ट्रीय तस्करीचा पर्दाफाश

## ◆ महिला कर्मचाऱ्यासह ९ जणांना DRI कडून अटक, २३ कोटींची मालमत्ता जप्त!

प्रतिनिधी २७ जून



**मुंबई:** परदेशी सोन्याच्या तस्करीविरुद्धच्या एका मोठ्या कारवाईत, महसूल गुप्तचर संचालनालयाने (ॐ) मुंबई विमानतळावर तस्करी करणाऱ्या टोळीतील नऊ सदस्यांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये विमानतळावर कार्यरत असलेल्या एका महिला कर्मचाऱ्याचाही समावेश आहे. डीआरआयने मुंबई विमानतळावरून चालणाऱ्या या संघटित सोन्याच्या तस्करीच्या टोळीचा पर्दाफाश केला. तपासादरम्यान, अधिकाऱ्यांना असे ठिकाणही सापडले जिथे तस्करी केलेले परदेशी सोने वितळवले जात होते.

डीआरआयच्या निवेदनानुसार, या संपूर्ण तस्करीच्या जाळ्याशी संबंधित नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये विमानतळावरील महिला कर्मचारी, तिला सूचना देणारी व्यक्ती, तीन मध्यस्थ, सोने वितळवण्याच्या युनिटचा चालक आणि वितळवण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या इतर तिघांचा समावेश आहे. डीआरआयने म्हटले आहे की, हे प्रकरण दर्शवते की सोन्याच्या तस्करीच्या टोळ्या पूर्वीपेक्षा अधिक संघटित आणि धूर्त झाल्या आहेत. त्या विमानतळावर काम करणाऱ्या व्यक्तींची मदत घेतात आणि बहु-स्तरीय जाळ्याद्वारे काम करून तपास यंत्रणांना चकवा देण्याचा प्रयत्न करतात. बंगळुरूमध्ये एका वेगळ्या कारवाईत, डीआरआयने १.८ किलो २४-कॅरेट सोन्याची पेस्ट जप्त केली, जी एका आंतरराष्ट्रीय प्रवाशाच्या कपड्यांच्या अनेक थरांमध्ये लपवून ठेवण्यात आली होती. त्यानंतर, आरोपीच्या निवासस्थानाची झडती घेतली असता सुमारे १.५ किलो सोन्याचे दागिने, ४५ किलो चांदी आणि भारतीय व परदेशी चलन सापडले. संबंधित व्यक्तीलाही अटक करण्यात आली. या आठवड्याच्या सुरुवातीला, डीआरआयने हैदराबाद, राजकोट, कालिकत, विशाखापट्टणम, गुवाहाटी आणि पेट्रापोल (पश्चिम बंगाल) येथील विमानतळ, रेल्वे स्थानके आणि सीमाशुल्क तपासणी नाक्यांवर अनेक कारवाया केल्या. या कारवायांदरम्यान एकूण ६ किलो तस्करीचे परदेशी सोने जप्त करण्यात आले आणि पाच जणांना अटक करण्यात आली. डीआरआयच्या मते, या सर्व कारवायांमध्ये एकूण सुमारे १५ किलो सोने, ४५ किलो चांदी आणि सुमारे २३ कोटी रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली असून एकूण १५ जणांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी, २० मे रोजी डीआरआय (मुंबई) ने 'ऑपरेशन गोल्डन ड्रॉप' अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय (एएश्ह) विमानतळावरून चालणाऱ्या सोन्याच्या तस्करीच्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश केला होता. डीआरआयच्या म्हणण्यानुसार, विशिष्ट माहितीच्या आधारे कारवाई करत अधिकाऱ्यांनी सुमारे ४.८ कोटी रुपये किमतीचे ३ किलो परदेशी सोने जप्त केले आणि एका आरोपीला अटक केली. तपासातून असे निष्पन्न झाले की, तस्करी केलेले सोने मेणासारख्या स्वरूपात रूपांतरित करून खास तयार केलेल्या अंड्याच्या आकाराच्या कॅप्सूलमध्ये लपवले जात असे. मुंबईपर्यंत हे सोने पोहोचवण्यासाठी प्रवासादरम्यानचे प्रवासी या कॅप्सूल गिळत असत.

# मध्य रेल्वेवर प्रवास होणार गारेगार!

प्रतिनिधी २७ जून

**मुंबई:** दोन महिन्यांपासून मध्य रेल्वेच्या ताफ्यात उभी असलेली वातानुकूलित लोकल आता लवकरच प्रवासी सेवेत दाखल होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याणदरम्यान १२ फेऱ्यांद्वारे ही लोकल प्रवाशांसाठी उपलब्ध होणार आहे. सध्या धावत असलेल्या सर्वसाधारण लोकल फेऱ्या रद्द करून त्या जागी एसी लोकल फेऱ्या सुरू करण्यात येणार आहेत.

दरवाजा बंद एसी लोकलमुळे धावत्या लोकलमधून पडण्याच्या घटनांना पूर्णपणे आळा घालणे शक्य आहे. यामुळे मुंबई उपनगरी रेल्वेच्या ताफ्यात अधिकाधिक एसी लोकल चालवण्याचे रेल्वे प्रशासनाचे नियोजन आहे. महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर अर्थात १ मे रोजी हार्बर मार्गावर १४ एसी फेऱ्या सुरू करण्यात आल्या होत्या. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याणदरम्यान १२ एसी लोकल फेऱ्या वाढवण्यात येणार आहेत. सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेतील फेऱ्यांमध्ये एसी लोकलचा समावेश करण्यात आला आहे. सध्या मुख्य मार्गावर ८० फेऱ्या असून वाढीव फेऱ्यानंतर हा आकडा ९२वर पोहोचणार आहे. मध्य रेल्वेवरील एकूण लोकल फेऱ्यांची संख्या १०८वरून १२०वर पोहोचणार आहे. याचे सविस्तर वेळापत्रक येत्या काही दिवसांत जाहीर करण्यात येणार आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मुंबई महापालिका उभारणार नवे सभागृह !

## ◆ ३५० आसनक्षमता, अधिकारी, पत्रकारांसाठी विशेष व्यवस्था

प्रतिनिधी २७ जून

**मुंबई :** मुंबई महापालिकेचे सध्याचे ब्रिटिशकालीन सभागृह नगरसेवक, अधिकाऱ्यांसाठी अपुरे पडत असल्याने नवे सभागृह उभारण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. सध्याच्या मुख्यालयासमोरील जिमखान्याच्या जागी चार मजली इमारत उभारली जाणार असून त्यात वरच्या मजल्यावर हे सभागृह साकारण्याचा अंतिम आराखडा तयार करण्यात आला आहे. ३५० क्षमता, नगरसेवक, अधिकारी, पत्रकारांसाठी व्यवस्था, विविध सुविधांनी युक्त असे हे सभागृह असेल. ऑगस्टमध्ये कामाचे भूमिपूजन करण्याचे नियोजन आहे. नवे सभागृह उपलब्ध होताच, जुन्या ऐतिहासिक वास्तू असलेल्या सभागृहाचा वापर महापौरांच्या बैठकीसाठी करण्याचे नियोजनही आहे. सध्याच्या सभागृहात २२७ नगरसेवक आणि दहा स्वीकृत नगरसेवकांसाठी आसनव्यवस्था आहे. त्या व्यतिरिक्त महापालिका कर्मचारी, पत्रकार यांना उभे राहता येईल, अशी काही



प्रमाणात जागा आहे. मात्र ही जागा अपुरी पडत असल्याने नवे सभागृह बांधण्याची मागणी विविध राजकीय पक्षांनी केली. मुंबई महापालिका मुख्यालयासमोरील जिमखान्याच्या जागेत नवे सभागृह असावे, यासाठी भाजप आग्रही आहे. या जागी टाऊनहॉल, जिमखान्याचे नूतनीकरण करण्याचा प्रस्ताव महापालिकेने तयार केला होता. हा प्रस्ताव स्थायी समितीने नुकताच फेटाळला. त्यामुळे जिमखान्याच्या जागेवर सभागृह उभारणीचा मार्ग मोकळाही झाला. आता सुधारित आराखडा तयार करून नवीन सभागृह उभारणीचे नियोजन मुंबई महापालिकेने केले आहे. यामध्ये जिमखानाही असेल. सध्याचे सभागृह आतून साधारण ५० फूट उंच आहे. नवीन सभागृहाची आतून उंची ३० ते ४० फूट असेल. हा प्रस्ताव तयार करून त्याची लवकरच स्थायी समितीकडून मंजुरी घेतली जाणार आहे.

### नवीन सभागृहात काय?

◆ नवीन सभागृह चार मजली असेल. खाली क्रीडासंकुल, त्यावर पार्किंग व्यवस्था. त्यानंतरच्या मजल्यावर नगरसेवक, आयुक्त, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेत्यांचे चेंबर. सर्वांत वर सभागृह असेल. यामध्ये नगरसेवक, अधिकारी व पत्रकार बसू शकतील अशी व्यवस्था. ८० वाहनांसाठी पार्किंगची जागा असेल. सत्ताधारी, विरोधकांसाठी स्वतंत्र लिफ्ट, जिने असणार आहेत.

# कांजुरमार्ग-घणसोली-बदलापूर मेट्रोसाठी प्रतीक्षा वाढली!

प्रतिनिधी २७ जून

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशाला जोडणाऱ्या सर्वात लांब मेट्रो लाइन १४ साठी पुन्हा एकदा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचं काम सुरू आहे. आयआयटी मुंबईने यापूर्वीच्या अहवालात काही सुधारणा करण्याचा सल्ला दिल्यानंतर एमएमआरडीएने पुन्हा एकदा प्रस्तावित कॉरिडोरची व्यवहार्यता मूल्यमापनासाठी निविदा मागवल्या आहेत. त्यामुळे हा प्रकल्प आणखी काही काळ लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.

मुंबईतील कांजुरमार्ग ते ठाणे जिल्ह्यातील बदलापूरपर्यंत मेट्रो १४चा मार्ग तयार करण्याचा

## ◆ प्रकल्प अहवालात त्रुटी

प्रस्ताव आहे. सुमारे ४३.६९ किमी लांबीची ही शहरातील सर्वात लांब मेट्रो असेल. मेट्रोचा मार्ग, प्रवासी संख्येचा अंदाज, डिझाइन आणि आर्थिक व्यवहार्यतेमध्ये आयआयटी मुंबईने काही सुधारणा करण्याचा सल्ला दिला आहे. याशिवाय या संपूर्ण परिसरात सध्या सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांची नोंद घेऊन या मेट्रोचा मार्ग निश्चित करण्यात येणार आहे. त्यामुळे आता नवीन सल्लागार नेमून सविस्तर प्रकल्प अहवाल पुन्हा तयार करण्यात येणार आहे. मेट्रो लाइन १४वर सध्या २४ स्थानकं प्रस्तावित आहेत. कांजुरमार्ग-घणसोली-कल्याण-अंबरनाथ असा या मेट्रोचा मार्ग असेल. मुख्य मुंबई शहराला पूर्व महानगर प्रदेशातील वेगाने वाढणाऱ्या उपनगरांशी जोडण्याच्या उद्दिष्याने ही मेट्रो मार्गिका तयार केली जात आहे. मध्य रेल्वे, ट्रान्स हार्बर रेल्वेसह अनेक मेट्रो मार्गांसोबत इंटरचेंज तयार केलेल असतील.

**नवे सल्लागार काय तपासणार?**

नव्या सल्लागारा सात महिन्यांची मुदत देण्यात येणार आहे. ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागवण्यात आल्या आहे. ७ जुलैपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे आणि त्यापूर्वी पूर्वतयारीसाठी एमएमआरडीएने बीकेसीमधील मुख्यालयात ३ जुलै रोजी बैठक बोलावली आहे. मेट्रो लाइन १४च्या मार्गावर खाडीला पार करणारा ३.२५ किमी लांब बोगदा आहे. कांजुरमार्ग येथे एक भुयारी स्थानक देखील असेल. २०१९मध्ये नियुक्त केलेल्या कपंनीने व्यवहार्यता अहवाल सादर करण्यात आला असून आयआयटी मुंबईने त्याचा आढावा घेतला. यावेळी अनेक भागांमध्ये सुधारणांची गरज असल्याचं संस्थेनं स्पष्ट केलं. नवीन सल्लागार मार्गावरील बोगदा, उन्नत मार्ग या दोन्ही विभागांचं संरेखन निश्चित करणं, स्थळ, तांत्रिक आणि भौतिक तपासणी करणं, परिसरातील रहदारी, प्रवाशांची संभाव्य संख्या, खर्चाचा अंदाज आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या मॉडेल अंतर्गत हा प्रकल्प राबविला जाऊ शकतो का या सर्व गोष्टींचा तपास करतील.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब पाजावेत

प्रतिनिधी २७ जून

## ◆ आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आवाहन

**मुंबई:** राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी रविवार, २८ जून २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे. या मोहिमेसाठी राज्यभरात ८९,४८९ लसीकरण बुथ, २६,५३० ट्रान्झिट पथके, १३,५१८ मोबाईल पथके आणि ५८६ रात्रपाळी पथके कार्यरत राहणार आहेत. देशाला पोलिओमुक्त ठेवण्यासाठी सन १९९५ पासून राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात पोलिओचा शेवटचा रुग्ण सप्टेंबर २०१० मध्ये बीड जिल्ह्यात आढळला होता, तर देशातील शेवटचा रुग्ण जानेवारी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये नोंदविण्यात आला होता. त्यानंतर २७ मार्च २०१४ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले.

मात्र, शेजारील काही देशांमध्ये अद्यापही पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने देशात या आजाराचा प्रसार होण्याचा धोका कायम असून सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात रविवार, २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ कोटी ३ लाख बालकांना सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत पोलिओ प्रतिबंधक बायव्हॅलेंट ओरल पोलिओ व्हॅक्सीन (ध्झ्र) चे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. बुधवर येऊ न शकलेल्या बालकांचे शहरी भागात पुढील पाच दिवस आणि ग्रामीण भागात पुढील तीन दिवस आरोग्य कर्मचाऱ्यांकडून गृहभेटीद्वारे लसीकरण करण्यात येईल. तसेच प्रवासात असलेल्या बालकांसाठी ट्रान्झिट, मोबाईल आणि रात्रपाळीच्या विशेष पथकांमार्फतही मोहिमेच्या कालावधीत लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य लसीकरण कृती दलाची बैठक घेण्यात आली असून सर्व संबंधित शासकीय विभाग आणि विविध यंत्रणांना सक्रिय सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. मोहिमेच्या समन्वयासाठी प्रत्येक जिल्हा आणि महानगरपालिकेसाठी राज्यस्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून जिल्हा, तालुका आणि वॉर्ड स्तरावरही नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य, जिल्हा आणि महानगरपालिका स्तरावर वैद्यकीय अधिकारी तसेच लसीकरण कर्मचाऱ्यांचे टप्प्याटप्प्याने प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा व शहर लसीकरण कृती दलाच्या बैठका घेण्यात आल्या असून मोहिमेसाठी आवश्यक निधी, वित्तीय मार्गदर्शक सूचना आणि पोलिओ लसीचा पुरेसा साठाही सर्व जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# खासदार श्रीकांत शिंदे-ओमराजे निंबाळकर एकत्र बालाजी दर्शनाला!

**मुंबई :** राज्यातील ऑपरेशन टायगर नंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर प्रत्येक खासदाराने आपल्या मतदारसंघात जाऊन कार्यकर्ते आणि मतदारांशी संवाद साधत पक्षांतराची भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यात खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. मात्र, मतदारसंघाच्या विकासासाठी आणि दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठीच आपण शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, केंद्र सरकारच्या संभाव्य मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना वेग आला असतानाच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांचा तिरुपती दौरा चर्चेचा विषय ठरला आहे. दोघांनी तिरुपती बालाजीचे दर्शन घेण्यासाठी तब्बल ११ किलोमीटरची पदयात्रा केल्याची माहिती समोर आली आहे.

# कारमध्ये बसताच आरोपीने मागचा दरवाजा उघडला, 'त्या' कृत्यानं हादरली मुंबई

प्रतिनिधी २७ जून

**मुंबई :** शहरातून वेळोवेळी अनेक गुन्हेगारीच्या गंभीर घटना समोर येत असतात. पण सध्या समोर आलेली घटना जी गंभीर असून दोन चिमुकल्यासमोर घडलेली आहे.

मुंबईत दिवसाढवळ्या घडलेल्या एका लुटमारीच्या घटनेने मोठी खळबळ उडालेली आहे. फुटबॉल क्लास संपल्यावर आपल्या दोन लहान मुलांना घेऊन घरीत जात असलेल्या महिलेसोबत हा प्रकार घडलेला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही संपूर्ण घटना बुधवारी खालसा आणि डॉन बॉस्को या परिसरात घडलेली आहे. महिला ही मुलांचा क्लास संपल्यानंतर कारमध्ये निघाली होती. याच दरम्यान अचानक एका आरोपीने कारचा मागील दरवाजा उघडला आणि



आतमध्ये प्रवेश केला. त्या वेळी महिलेची दोन्ही मुले मागील सीटवर बसलेली होती. धक्कादायक गोष्ट म्हणजे आरोपीने त्याच्याकडील चाकू काढत महिलेकडे पैशांची मागणी केली आणि आवाज केल्यास हल्ला करण्याचीही भिती दाखवली, अशी धमकीही त्याने दिली. मात्र महिला या प्रकाराला घाबरुन न जाता तिने मोठ्याने आरडाओरड करत आरोपीला प्रतिकार केला.

त्यानंतर महिलेचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तातडीने तिच्याकडे धाव घेतली. सर्वांना येताना पाहून आरोपीने कारमधून पळ काढण्याचा प्रयत्न केला मात्र, नागरिकांनी त्याचा पाठलाग करुन त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. भररस्त्यात घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरोपीला घटनास्थळावरुन ताब्यात घेतले आहे. गंभीर गोष्ट म्हणजे पोलिसांनी त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून दोन धारदार चाकू जप्त करण्यात आलेले आहेत. या प्रकरणी त्या आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला अून आरोपीची चौकशी सुरु केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135